पुण्यनगरी
दि. 10-12-2023

# अर्धापूर, सिडकोत बॅग लिफ्टींग करणारा जेरबंद

## आंतरराज्य टोळीचा लवकरच पर्दाफाश



**नांदेड/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अर्धापूर व नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत बॅग लिफ्टींगच्या गुन्ह्यात वाढ झाली होती. त्या अनुषंगाने पोलिसांनी विविध पथके तयार करुन या गुन्ह्यांचा शोध घेणे सुरु केले होते. यामध्ये आंतरराज्यीय गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.या प्रकरणात ओडीसा येथील एकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून ४ लाख २३ हजारांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील अर्धापुर व नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत सराफा व्यापाऱ्यांच्या बॅग लिफ्टींगचे गुन्हे घडलेले होते. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना स्वतंत्र पथक नेमून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार सपोनि रवि बाहुळे व पोलीस अंमलदारांचे एक स्वतंत्र पथक तयार करण्यात आले होते. अर्धापूर व नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यांचा तपास केला असता त्यात गुन्हे करण्याची पद्धत एकसारखी होती. या गुन्ह्यात तेलंगणा, आंध्रप्रदेश व ओडीसा राज्यात आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके पाठविली होती. दरम्यान या आरोपीने नांदेडमध्ये खोली घेतल्याची माहिती प्राप्त झाली. या माहितीच्या आधारे स्थागुशाच्या पथकाने सापळा रचून आरोपी दिपक इसफुल प्रधान (२१, रा. दाहीसाही, मुंडामल, व्यासनगर, जाजपुर रोड, जि. जाजपुर राज्य ओरीसा) यास ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने पो.स्टे. अर्धापुर गुरनं ४०५/२३ कलम ३७९,३४ भादंवि व पो.स्टे. नांदेड ग्रामीण गुरनं ८३९/२३ कलम ३८०,३४ भा. दं. वि. हे दोन गुन्हे केल्याची कबूली दिली. त्याच्याकडून ४ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुन्ह्यातील इतर आरोपी निष्पन्न करण्यात आलेले आहेत. आरोपीस पुढील तपासासाठी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराव, सपोनि रवि बाहुळे, सपोउपनि माधव केंद्रे, **(पान २ वर..)**

(पान १ वरून)

## अर्धापूर, सिडकोत...

पोना पद्मसिंह कांबळे, पो.ना. दिपक पवार, पोना संजीव जिंकलवाड, चापोकाँ कलीम शेख, पोहेकाँ दिपक ओढणे, पोहेकाँ राजू सिटीकर, पोहेकाँ मारोती तेलंग, पोहेकाँ गुंडेराव करले, पोहेकाँ सुरेश घुगे, पोकाँ देवा चव्हाण, पोकाँ गजानन वचनवाड, पोकाँ ज्वालासिंघ बावरी, चापोका हनुमानसिंह ठाकुर, पोहेकाँ संग्राम केंद्रे, पोकाँ मारोती मोरे, धम्मानंद जाधव यांनी ही कारवाई केली. या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पोलीस अधीक्षकांनी कौतुक केले आहे.